**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे "विशेष अपील निर्गत कार्यक्रम" दि. १६.०७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०७७ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.मधुकर नारायण कान्टे,<br>१६३/२,शुक्रवार पेठ<br>(केवटे बि.३ रा मजला पूर्व),पुणे २ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | तालुका निरीक्षक,<br>भूमी अभिलेख भोर, जि.पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधीक्षक,<br>भूमी अभिलेख, पुणे यांचे कार्यालय,<br>जि.पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री.मधुकर नारायण कान्टे,१६३/२,शुक्रवार पेठ (केवटे बि.३ रा मजला पूर्व),पुणे २ यांनी दिनांक ३०.११.२००६ रोजीचे अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख भोर, जि.पुणे यांचेकडे वेल्हे-नसरापूर पूर्वी रस्त्याचे संपादन झाले त्यावेळी (तालुका राजगड) मौजे कोळवडी जुना सर्व्हे नं.२८ पोट हि.नं.१ जमीनीचे संदर्भात, फेरफार, फाळणी बारा व तत्संबंधी माहितीची मागणी केली होती.

वरील तीन घटकांत झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्ता श्री.कान्टे यांच्या मागणीप्रमाणे स.न.२८ चे हक्क कायम मोजणी अंती संपादित रस्त्याचा उल्लेख मोजणी नकाशाद्वारे करण्याचे जन माहिती

अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले. सदरची माहिती अभिलेख माध्यमातून मिळणार असल्याने अपील निकाली काढण्यास श्री.कान्टे यांनी मान्यता दिली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.
२) जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचा पूर्तता अहवाल आदेश प्राप्त होताच आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दिनांक : ३१-१०-२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.महेंद्र विठ्ठल मांढरे
१४५, कोथरुड, पुणे - ३८

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हवेली, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२६ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.महेंद्र विठ्ठल मांढरे
१४५, कोथरुड, पुणे - ३८

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हवेली, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.४.२००८ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मौजे कोथरुड येथील स.नं.११३/१ व ११३/२ बाबतची माहिती व संबंधित हुकूम, फाळणी व मोजणीच्या प्रती व स.नं.१०२,११३ व २०/२/१ वरील फेरफार मिळणेबाबत. |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता श्री.जयंत विठ्ठल मांढरे यानी जमिनीच्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती मान्य नसल्याने श्री.मांढरे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली यांच्याकडे अपील केले. अपीलकर्ता गैरहजर असल्याच्या कारणावरुन व जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर योग्य ठरवून अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील निकाली काढले. जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीसाठी प्रतिपृष्ठ रुपये १० प्रमाणे नक्कल शुल्क शासनाकडून विहित करण्यात आल्यानुसार घेतली. त्याविरुध्द श्री.मांढरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१७.३.२००८ रोजी पुणे येथे झालेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. परंतु जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी त्या दिवशी उपस्थित राहू न शकल्यामुळे दि.२१.५.२००८ रोजी या अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

शासकीय निर्धारित दरानुसार नक्कल शुल्क घेण्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अनुषंगाने राज्य सरकारने केलेल्या नियमावलीत मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे नक्कल शुल्क आकारणीचा निर्णय योग्य असला तरी या वादात अपीलकर्त्याला पूर्ण माहिती मिळण्यास झालेला विलंब लक्षात घेऊन अपवाद म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार रुपये २ प्रतिपृष्ठप्रमाणे शुल्क घ्यावे व ऊर्वरित रक्कम अपीलकर्त्यास परत करावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) रुपये २ प्रतिपृष्ठप्रमाणे शुल्क घेऊन ऊर्वरित रक्कम परत देण्याच्या आदेशानुसार पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली यांनी आयोगाला आठ दिवसात सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२७.१०.२००७**

ऑक्टोबर-

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे "विशेष अपील निर्गत कार्यक्रम" दि.२१.१०.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १२७० | श्री.कासिम हैदर शेख इ/५०, शास्त्रीनगर, येरवडा, पुणे -६ | शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, ५ फायनान्स रोड, पुणे | व्यवस्थापक, छायाचित्र नोंदणी कार्यालय, ५ फायनान्स रोड, पुणे | १) जून २००६ चे किती कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन अडवून ठेवले व त्याची कारणे<br>२) कर्मचाऱ्यांना केव्हा वेतन अदा करण्यात येईल. |
| २ | १३१४ | श्री.एस.एल. कुलकर्णी १०/७४, फुलेनगर, आळंदी रोड,पुणे-६ | उपसंचालक, भूमी अभिलेख, नाशिक प्रदेश, नाशिक यांचे कार्यालय, सी.बी.एस. एस.टी. स्टँडजवळ, आग्रा रोड, नाशिक | उपसंचालक, भूमी अभिलेख, नाशिक प्रदेश, नाशिक यांचे कार्यालय, सी.बी.एस. एस.टी. स्टँडजवळ, आग्रा रोड, नाशिक | (१) वर्ग ३ व ४ मधील किती कर्मचाऱ्यांचे राजीनामे मंजूर केले (२) त्यापैकी किती कर्मचाऱ्यांनी एक महिन्याची नोटीस दिलेली होती. अशी नोटीस दिलेली असताना ज्या कर्मचाऱ्यांकडून एक महिन्याचे वेतन वसूल करण्यात आले त्यांची नावे, शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनाची अंमलबजावणी न करण्याची कारणे, राजीनामे स्वीकृती / अस्वीकृती नोटीस दिली काय? |
| ३ | १३२९ | श्री.उमेश सुरेश बिवाल ४२३, सोमवार पेठ, पुणे -११ | अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे | अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे | नोकरीबाबत शासन आदेशाचे खुलासे. |
| ४ | १३३५ | श्री.शहीद रझा बर्नी डी/३,अमर क्लासिक, हडपसर, पुणे-२८ | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम ब्रीज,पुणे | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम ब्रीज,पुणे | प्रशासकीय कामकाजाबाबतची माहिती |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | १३५० | श्री.विजय हणमंत मुळगुंद एम.आय.जी.११/ ३९७, म्हाडा कॉलनी, विष्णू दर्शन सोसायटी, लक्ष्मीनगर,पुणे-९ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुख्य अभियंता यांचे कार्यालय, पुणे परिमंडळ, रस्तापेठ,पुणे-११ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुख्य अभियंता याचे कार्यालय, पुणे परिमंडळ, रस्तापेठ,पुणे-११ | ग्राहकांचे वीज बीलापोटी भरलेले चेक वारंवार अनादरीत होतात अशा ग्राहकांचा तपशील. |
| ६ | १४३४ | श्री.विकास भिमराव गायकवाड मु.पो.वडापुरी, ता.इंदापूर, जि.पुणे | कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे | अधिक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे | कार्यालयातील कामकाजाबाबतची माहिती. |
| ७ | १४४४ | श्री.विवेक पांडूरंग सावंत काळुबाईनगर, सर्व्हे नं. १३, कोठारी शो रुम मागे, खराडी,पुणे | कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद पुणे | उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, पुणे | दि.२२.१०.१९९०रोजी अनुकंपा तत्त्वावर नोकर भरतीबाबतचा खुलासा |
| ८ | १४६५ | श्री.गंगाकिसन भाई ओझा छत्रपती शिवाजी चौक, ता.दौंड, जि.पुणे | सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, म.रा. लकी बिल्डींग,७९१/९३, नवीन गुरुवार पेठ, पुणे -४२ | सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, म.रा. लकी बिल्डींग,७९१/९३, नवीन गुरुवार पेठ, पुणे -४२ | ओझा ट्रेडर्स, नुतनीकरण दाखला, भेसळीचे लायसन्स न देण्याबाबत. |
| ९ | १४८८ | श्री.फिरोज अल्लाउद्दिन जमादार अलहाजी अपार्टमेंट, तळमजला, फ्लॅट नं.२, अफ्रिन पार्क, गोवळकोट रोड, चिपळूण, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी | आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे-१ | आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१ | डी.एड.परीक्षा नोव्हेंबर,२००६ उत्तरपत्रिका झेरॉक्स मिळणेबाबत. |
| १० | १४९२ | श्री.विनोद प्रताप मेहता ड-३५, हरी पर्व रेसीडन्सी, २२, गिरमेबाग,पुणे-१३ | सदस्य सचिव, सल्लागार समिती, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मा.प्र.वि.), जिल्हा परिषद, पुणे | सदस्य सचिव, सल्लागार समिती, मुख्य कार्यकारी अधिकारी (मा.प्र.वि.), जिल्हा परिषद, पुणे | गोपनीय अहवालाच्या प्रति मिळणेबाबत व वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर होणेबाबत. |
| ११ | १४९५ | श्री.भजनलाल यशवंतराव | स्वीय सहायक, अपर विक्रीकर | स्वीय सहायक, अपर विक्रीकर | विक्रीकर कार्यालयाचे पत्र क्रमांक:अविआ/पुक्षे/आ/मा.अधि/ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | निमगावकर<br>सर्व्हे नं.७२१/३,१-अ, शोनान सोसायटी , नवी पेठ,पुणे-३० | आयुक्त, पुणे क्षेत्र, विक्रीकर भवन, चौथा मजला,येरवडा, पुणे-६ | आयुक्त, पुणे क्षेत्र, विक्रीकर भवन, चौथा मजला, येरवडा, पुणे -६ | अपिल/२००७/ब-१३९९ पुणे,दि.०५.०६.२००७ च्या पत्रामध्ये नमूद केलेल्या मुद्दयांची माहिती मिळणेबाबत. |
| १२ | १४९७ | श्री.वसंत आप्पासो चौगुले<br>सर्व्हे नं.४९/२, प्लॉट नं.४४, चंदननगर, पुणे -१४ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई -१ | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई | गव्हर्नमेंट प्रिंटिंगप्रेस, चर्नी रोड, मुंबई यानां पुरवठा केलेल्या साधनसामुग्रीबाबत. |
| १३ | १५०१ | श्री.गिरीधर महादेव करमाळकर<br>गंगाधर कुटीर, राजगुरुनगर, भोसरी,पुणे-३९ | उप शिक्षणाधिकारी (माध्य.), पुणे जिल्हा परिषद, पुणे-१ | उप शिक्षणाधिकारी (माध्य.), पुणे जिल्हा परिषद, पुणे-१ | शिक्षणसेवक किती कालावधीसाठी व त्याबाबत मान्यता |
| १४ | १५१८ | श्री. प्रकाश रघुनाथ पाचारणे<br>मु.पो.राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे | प्रभारी संशोधन अधिकारी, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे-३७ | अपर जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे-३७ | समितीचे कामकाजपध्दतीच्या माहितीबाबत एकूण ९ मुद्दे |
| १५ | १५२२ | श्री.विशाल रामचंद्र खेले<br>गुजरमळा विधाटे डॉक्टर लाईन, गुरुप्रसाद बिल्डिंग, मु.पो.ता.शिरुर, जि.पुणे | विशेष जि.स.क.अधिकारी, पुणे कार्यालय, पी.एम.टी.बिल्डिंग, समिती क्र.३, स्वारगेट, पुणे -३७ | विशेष जि.स.क.अधिकारी, पुणे कार्यालय, पी.एम.टी.बिल्डिंग, समिती क्र.३, स्वारगेट, पुणे -३७ | लोहार जातीचे जात वैधता प्रमाणपत्र मिळणेबाबत |
| १६ | १५५१ | श्री.कांताराम तात्याबा काळे<br>मु.पो.घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे | ग्रामपंचायत घोडेगाव, पंचायत समिती आंबेगाव, ता.आंबेगाव,जि.पुणे | ग्रामपंचायत घोडेगाव, पंचायत समिती आंबेगाव, ता.आंबेगाव,जि.पुणे | दि-०१.०७.९८ ते ०१.०३.०७ दरम्यानची काळेवाडी दरेकर वाडी ग्रामपंचायत, ता.घोडेगाव यांचे लेखा परीक्षण झालेल्या अहवालाची प्रत. |
| १७ | १५७३ | श्री.अच्युतराव देवराम कांबळे<br>मु.पो.बावडा, ता.इंदापूर,जि.पुणे | पुणे जिल्हा परिषद पुणे, ग्रामपंचायत विभाग,यशवंतराव चव्हाण भवन,पुणे | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे, पुणे | श्री.आर.एम.साळुंखे, विस्तार अधिकारी यांची खात्यामार्फत चौकशी करणेबाबत व प्रशासकीय कारवाईबाबत मागणी. |
| १८ | १५७५ | श्री.महादेव भगवान लोंढे<br>मु.पो.गागरगाव, ता.इंदापूर,जि.पुणे | प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यंत्रणा, जिल्हा परिषद,पुणे | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,पुणे | गोमुख ट्रस्ट, पुणे या स्वयंसेवी संस्थेस सन २००५-२००७ अखेर मंजूर करण्यात आलेल्या सर्वच पूर्ण / अपूर्ण व चालू कामांची माहिती |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९ | १५८१ | श्री.सदानंद जगन्नाथ शेरे मु.पो.जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे | विशेष भूमी संपादन अधिकारी, क्र.६, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,पुणे | विशेष भूमी संपादन अधिकारी, क्र.६,जिल्हाधिकारी कार्यालय आवार,पुणे | कोर्टात दावा चालू असताना भूमी संपादन कशी केली व त्याबाबत पेमेंट कसे केले याबाबत माहिती. |

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता उभय बाजूंचे माहितीबाबत व अपील निकाली काढण्याबाबत एकमत झाले. प्राप्त माहितीने समाधान झाले असल्याचे अपीलकर्त्यांनी मान्य केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील सर्व (क्रमांक १ ते १९) अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दिनांक :** 3/10/2008

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १९.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३६ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. रणजित विठ्ठल क्षीरसागर<br>मु.पो. अकलूज , ता. माळशिरस, जि. सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सातारा | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हाधिकारी, सातारा | -- |

अपीलकर्ता श्री. रणजित विठ्ठल क्षीरसागर यांनी दि. १८.८.१९८७ रोजी अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सातारा यांना आयुक्त, दारूबंदी व उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून मिळालेल्या पत्राची साक्षांकित प्रत, तसेच त्या पत्रातील संदर्भानुसार अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सातारा यांनी दि. २७.७.१९८७ रोजी आयुक्त, दारूबंदी व उत्पादन शुल्क, मुंबई यांना पाठविलेल्या पत्राची साक्षांकित प्रत, जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सातारा यांच्याकडे मागितली होती. साक्षांकित करून मागितलेली प्रत या कार्यालयाची नसल्याचे, तसेच वरिष्ठ कार्यालयात सदर अभिलेख उपलब्ध नसल्याने त्यानीही पत्राची प्रत साक्षांकित करून दिली नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी लेखी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. संबंधित कागदपत्रे उपलब्ध न होण्याबाबत चौकशी करून आयुक्त, दारूबंदी व उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसात अहवाल आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दि. २२.९.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे "विशेष अपील निर्गत कार्यक्रम" दि.२१.१०.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलांचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी |
|---|---|---|---|---|---|
| | १३९३/ पुणे | श्री.विहार शिवाजीराव दुर्वे ५७३/१, पवन विहार, जंगली महाराज रोड, शिवाजीनगर, पुणे | उप प्रादेशिक परिवहा अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम ब्रीज, पुणे | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम ब्रीज, पुणे | प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम ब्रीज, पुणे यांचेकडे वाहनांच्या नोंदणीबाबतच्या कार्यवाहीबाबतची माहिती मागितली होती. |
| १ | १३९४ / पुणे | श्री.विहार शिवाजीराव दुर्वे ५७३/१, पवन विहार, जंगली महाराज रोड, शिवाजीनगर, पुणे | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम ब्रीज, पुणे | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम ब्रीज, पुणे | प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम ब्रीज, पुणे यांचेकडे पुणे महानगरपालिका, पुणे कँन्टोन्मेंट बोर्ड व पुणे जिल्हापरिषद यांना राज्य शासनाकडून पुरविण्यात येणाऱ्या वाहनांना देण्यात येणाऱ्या क्रमांकासाठी विशेष शुल्क भरले किंवा कसे, याबाबत माहिती माहिती होती. |

वरील दोन्ही अपिलांबाबत श्री.दुर्वे यांनी दि.१७.१०.२००८ रोजीच्या निवेदनात अपील निकाली काढण्याबाबत नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक :** ३१/१०/२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २१.८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. गोरख निळोबा बनसोडे, रा. रहिमतपूर, ता. कोरेगांव, जि. सातारा यांच्या खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | १६० + १८८ / सातारा | शिक्षण सहसंचालक उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर | विभागीय शिक्षण सहसंचालक (उ. शि), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर | भविष्य निर्वाह निधीचा क्रमांक व कपाती बाबतची माहिती | भविष्य निर्वाह निधीची विलंबित काळाची रक्कम योग्य दराने कपात करून महाविद्यालयामार्फत विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर यांचेकडे जमा केल्यानंतर ती अपीलकर्ता घेण्यास तयार आहे. चर्चेनुसार अपीलकर्त्याने अपील निकाली काढण्यास मान्यता दिली, असे प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. ६.१०.२००८**

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बाळासाहेब संभू बिडवे
प्लॉट नं.४८, गव्हर्मेंट कॉलनी, विश्रामबाग, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बाळासाहेब संभू बिडवे
प्लॉट नं.४८, गव्हर्मेंट कॉलनी, विश्रामबाग, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली
तत्कालीन-श्री.आर.टी.शिंदे, विद्यमान- प्र.श्री.पराग सोमण

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली
तत्कालीन-श्री.जे.टी.बिराजदार, विद्यमान-श्री.अरुण तांबे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.८.२००६ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>कुपवाड गाव, तालुका मिरज, जि.सांगली स.नं.१९४ ते १९८ जुना व नवा स.नं.१६८ ते १७२ याची सद्यस्थिती-५२५ प्लॉट धारकांची. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे तरतुदीनुसार उत्तर मिळावे. |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता श्री.बाळासाहेब संभू बिडवे यांनी मौजे कुपवाड, ता.मिरज येथील स.क्र.१६८ ते १८२ च्या संदर्भात हक्काबाबतच्या वादाच्या अनुषंगाने शासकीय स्तरावरील कार्यवाहीबाबतच्या पत्राची प्रत मागितली होती. ही प्रत त्यांना जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली. परंतु केवळ ती प्रत न मिळता कार्यवाहीबाबतची संपूर्ण माहिती मिळावी व प्रामुख्याने कार्यवाही व्हावी, यासाठी श्री.बिडवे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडे अपील केले. परंतु श्री.बिडवे यांची मागणी माहितीची नसून कार्यवाहीची आहे, या कारणावरुन अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली यांनी अपील फेटाळले, त्याविरुध्द श्री.बिडवे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

मौजे कुपवाड येथील संबंधित जागेमध्ये ५२५ भूखंड असून त्यांच्या हक्काबाबत तहसीलदार, मिरज यांनी फेब्रुवारी २००३ मध्ये दिलेल्या निर्णयाने भूखंडधारकांवर अन्याय झाला आहे, असे श्री.बिडवे यांचे म्हणणे आहे. तहसीलदार, मिरज यांनी दिलेला निर्णय उपविभागीय अधिकारी, मिरज उपविभाग, सांगली यांनी कायम केला आहे. त्याविरुध्द अप्पर जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडे सहा अपिले दाखल आहेत. या विषयासंदर्भात श्री.बिडवे हे राज्य शासनाकडे व केंद्र शासनाकडे विविध अधिकारी व पदाधिकारी यांच्या नावे सातत्याने अर्ज करीत असून त्यांना वेळोवेळी उत्तरे देण्यात आली आहेत, असे जिल्हाधिकारी, सांगली यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. श्री.बिडवे यांच्या त्या अपिलांवर निर्णय झाल्यावर त्यांना कळविण्यात येईल, असेही त्यांना स्पष्ट करण्यात आल्याचे जिल्हाधिकाऱ्यांच्या दि.४.१०.२००७ च्या निवेदनात नमूद केलेले आहे.

दोन वर्षे सहा महिने होऊन गेले तरी आपल्याला न्याय मिळत नाही, अशी तक्रार श्री.बिडवे यांनी सातत्याने सर्व पत्रांत केली आहे. मात्र माहिती व कार्यवाही यामध्ये श्री.बिडवे गल्लत करत आहेत. प्रधान सचिव, महसूल व वनविभाग यांनी मागविलेल्या अहवालावर त्वरित कार्यवाही करावी, अशी त्यांची मुख्य मागणी आहे. 'संबंधित प्रकरण महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार तपासावे व वस्तुस्थितीदर्शक स्वयंस्पष्ट अहवाल दि.२०.५.२००६ पूर्वी शासनास सादर करावा,' असे प्रधान सचिव, महसूल व वनविभाग यांनी जिल्हाधिकारी, सांगली यांना डिसेंबर २००५ मध्ये कळविले होते. त्यानंतर त्याबाबत स्मरणपत्रेही शासनाने पाठविली आहेत. परंतु हा अहवाल सादर केला गेलेला नाही, असे श्री.बिडवे यांचे म्हणणे आहे. डिसेंबर २००५ पासून शासनाने कळवूनही जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबतचा अहवाल अडीच वर्षे झाली तरी पाठविलेला नाही. हा त्यांचा मुख्य मुद्दा आहे. या अहवालाबाबतची वस्तुस्थिती अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली यांनी चार दिवसात श्री.बिडवे यांना कळवावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्यानुसार जिल्हाधिकारी, सांगली यांनी शासनाला दि.२१.५.२००७ रोजी सादर केलेल्या अहवालाची प्रत व श्री.बिडवे यांना दिलेल्या पत्राची प्रत दि.१५.५.२००८ रोजी जिल्हाधिकारी, सांगली यांनी श्री.बिडवे यांना पाठविल्याचे आयोगास कळविले. परंतु आपल्याला योग्य अहवाल मिळाला नाही, अशी तक्रार श्री.बिडवे यांनी दि.२८.५.२००८ रोजी व पुढे नंतरही सातत्याने केली. डिसेंबर २००५ मध्ये शासनाने अहवाल मागवूनही अद्याप अहवाल पाठविला का जात नाही, असा प्रश्न श्री.बिडवे यांनी सातत्याने उपस्थित केला आहे. याबाबत आयोगाने केलेल्या विचारणेवर निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली यांनी २०.९.२००८ रोजी खुलासा सादर केला आहे. संबंधित सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती श्री.बिडवे यांना देण्यात आलेल्या आहेत. अप्पर जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडील सहा अपिलांची सुनावणी चालू असून त्यांचा निर्णय झाल्यानंतर त्याप्रमाणे श्री.बिडवे यांना कळविण्यात येईल, असे त्यांनी या पत्रात पुन्हा स्पष्ट केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व उभय बाजूंची निवेदने लक्षात घेता श्री.बिडवे मुख्यतः प्रशासकीय कार्यवाहीची मागणी करत असून अहवाल पाठविण्यास जिल्हाधिकारी, सांगली

कार्यालयाकडून झालेला प्रदीर्घ विलंब हा त्यांच्या तक्रारीचा मुख्य विषय आहे. तो माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

( विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १४.१०.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २२.८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. जयंत जोशी, रा. फलटण जि. सातारा यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९२ / सातारा | कार्यकारी अभियंता, निरा उजवा कालवा विभाग, फलटण, जि. सातारा | अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ, पुणे-११ | श्री. भोईटे उ.जा. या शासकीय कर्मचाऱ्या- विरूध्द खातेनिहाय चौकशी सुरू केली असल्यास त्या फाईल नोटिंगसह अहवालाच्या प्रती, चौकशी सुरू झाली नसल्यास का नाही, याची माहिती | अपीलकर्ता गैरहजर. माहिती वेळेत दिली असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले.<br>श्री. जयंत जोशी यांनी फाटा क्र.२२ च्या कडेने झालेले अतिक्रमण हटविणेबाबत कारवाई व्हावी यासाठीची तक्रार केली होती. आता अतिक्रमण हटविणेची कारवाई प्रस्तावित असले कारणाने त्यांना विहित कालावधीत माहिती देण्यात आली आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २०.१०.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. शिवाजी जगन्नाथ वाडेकर
शासकीय दूध योजना, सोलापूर
विजापूर रस्ता, सोलापूर
अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
उप सचिव, वित्त विभाग, सेवा-९,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

**जन माहिती अधिकारी** तथा
अवर सचिव, वित्त विभाग, सेवा-९,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९५ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६.८.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** : श्री. शिवाजी जगन्नाथ वाडेकर
शासकीय दूध योजना, सोलापूर
विजापूर रस्ता, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा अवरसचिव, वित्त विभाग, सेवा-९,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
श्री. अ.वि. जोशी प्रतिनिधी

## विवेचन

अपीलकर्ता श्री. शिवाजी जगन्नाथ वाडेकर यांनी उच्चस्तर वेतनत्रुटी समितीच्या अहवालाची प्रत, वेतन असमानता समितीच्या अहवालाची प्रत व इतर अनुषंगिक एकूण सात मुद्दयांची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराने व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपीलकर्त्याचे समाधान झालेले नसल्याने राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल करण्यात आले आहे.

सदर अपिलाची सुनावणी दि. २६ ऑगस्ट २००८ रोजी झाली. अपीलकर्त्यास अपेक्षित असलेली माहिती नि:शुल्क देण्याबाबत आयोगाने आदेशित केलेले होते. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपेक्षित असलेली माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करून दिलेली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** ३१ .१०.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १८.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०५ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. शिवाजी हणमंत सुगरे<br>सलगरवस्ती, डोणगांव रोड, सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. शिवाजी हणमंत सुगरे यांनी खाजगी प्राथमिक शाळा, वेतनेतर अनुदानास ११ खाजगी शाळांकडे ऑडिट वसुली असून ऑडिट वसुली नसल्याचे कार्यालयीन टिप्पणी प्रमाणपत्र देऊन अर्थ विभागाकडे देयके पाठविली, त्या देयकांची व सदर कार्यालयीन टिप्पणीची नक्कल द्यावी. सदर ऑडिट वसुली करून मगच देयके देण्यात येतील, असे लेखी कबूल करून अर्थ विभागाकडून मिळालेल्या धनादेशातून कोणत्या शाळेकडून किती ऑडिट वसुली केली हे दर्शविणारा तक्ता द्यावा. शिक्षण खात्याने याबाबत दिलेल्या खोट्या प्रमाणपत्राचा मुख्य लेखाधिकारी व वितरण अधिकारी यांना दिलेल्या खुलाशाची नक्कल जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), यांच्याकडे मागितली होती.

अपीलकर्ता व अपिलीय प्राधिकारी यांनी सादर केलेल्या निवेदनाचा विचार करता जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचे नमूद केले. मात्र अपीलकर्त्याने अपुरी व चुकीची माहिती दिल्याचे म्हटले आहे. मागितलेली माहिती विस्तृत स्वरूपाची आहे. विहित मुदतीत जन माहिती अधिकाऱ्यांनी कार्यवाही केली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. द्यावयाच्या राहिलेल्या माहितीचा नेमका तपशील भाष्य न करता अपीलकर्त्याने द्यावा व देय माहिती जन माहिती अधिकारी यांनी १५दिवसात द्यावी. त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगाला त्वरित सादर करावा.

**पुणे**
**दि. १२ .९.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २१.८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. मकरंद कृष्ण सिधये, रा. स.नं. ६५/१ब/१, जाधववाडी, ता.फलटण, जि. सातारा यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | २१५ / सातारा | तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, फलटण, जि.सातारा | जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सातारा | मौजे जाधववाडी (फ) ता. फलटण येथील सर्व्हे नं.६६/१ च्या मोजणी बाबतची माहिती | माहिती वेळेत न दिल्याबद्दलचे अपीलकर्त्याचे मत आहे, शास्ती बाबतची भूमिका. अपीलकर्त्यास माहिती देण्यास विलंब न झाल्याचे नमूद करून पुन्हा माहिती देण्याची जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी नमूद केले आहे. अपीलकर्त्याने माहिती बाबत खुलासेवजा विचारणा केली असून ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १७.१०.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २१.८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. सुरेश बाबुराव आखाडे, मु.पो.गादळवाडी, ता.महाबळेश्वर, जि. सातारा यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | २१८ / सातारा | नायब तहसीलदार, महाबळेश्वर जि.सातारा | तहसीलदार महाबळेश्वर जि.सातारा | सन २००० ते २००६ या वर्षात पावसामुळे झालेल्या नुकसानीची पहाणी करून केलेल्या पंचनाम्याच्या नकला, गादळवाडी या ठिकाणी अती वृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई कोणा कोणास दिली याची माहिती, सदर जागेची पहाणी भुगर्भ शास्त्रज्ञ यांनी केली असून त्यांनी केलेल्या पाहणीच्या अहवालाच्या प्रती | अपीलकर्ता गैरहजर. माहिती तयार असून माहितीचे शुल्क भरुन माहिती घेऊन जाण्यास जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास लेखी कळविले. परंतु अपीलकर्त्याने संपर्क साधलेला नाही व माहितीचे शुल्कही भरलेले नाही. अपीलकर्त्याने शुल्क भरून जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार यांच्याकडून माहिती प्राप्त करून घ्यावी. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** १७.१०.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ